Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Valume-VII,
Issue-I
January - March
2018

IMPACT FACTOR
/ INDEXING
2017 - 5.2
www.sjifactor.com

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

ISSN 2277-5730

# AJANTA

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII | Issue - I | ENGLISH / MARATHI | January - March - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING

2017 - 5.2

www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

Volume - VII - Issue - I - January - March - 2018
AJANTA - ISSN - 2277 - 5730 - IMPAACT FACTOR - 5.2 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय संघराज्य - सिद्धांत आणि व्यवहार<br>**प्रा. डॉ. खान इकबाल गफार** | १-३ |
| २ | भारतीय संघराज्याची सैद्धांतिक बैठक<br>**डॉ. आर. बी. शेजूळ** | ४-७ |
| ३ | केंद्र-राज्यातील बदलते आर्थिक संबंध<br>**प्रा. गुप्ता दिपमाला तिर्थराज** | ८-१० |
| ४ | भारतीय संघराज्य व आर्थिक सुधारणा<br>**प्रा. जया मोतीराम डवले** | ११-१३ |
| ५ | भारतीय राज्यघटनेतील वृत्तपत्रे आणि बदनामी विषयक तरतूदी<br>**डॉ. गायकवाड मिलिंद धोंडीबा** | १४-१९ |
| ६ | भारतीय संघराज्य: सातत्य व बदल<br>**शेख जब्बार खलील** | २०-२६ |
| ७ | भारतीय संघराज्यासमोरील प्रादेशिकतेचे आव्हाने<br>**प्रा. ओंकार नरेंद्र केने** | २७-३१ |

# ७ भारतीय संघराज्यासमोरील प्रादेशिकतेचे आव्हाने

**प्रा. ओंकार नरेंद्र केने**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

## प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन लेखात भारतीय संघराज्य पद्धतीचा अभ्यास केला आहे. संघराज्य पद्धतीत प्रादेशिक अस्मितेचे आव्हान व त्यासाठी झालेले संघर्ष याचा अभ्यास सदर लेखात मांडण्याचा प्रत्यन केला आहे. असे करीत असताना प्रमुख तीन उद्दिष्ट्यांच्या आधारे प्रथमत: संघराज्य पद्धती संकल्पना अभ्यासली आहे. प्रादेशिकता संकल्पनेचे आधार अभ्यासलेले आहेत. त्या आधाराद्वारे भारतीय संघराज्यात झालेले वेगवेगळे संघर्ष अभ्यासून त्यावर आधारीत निष्कर्ष काढले आहेत.

## अभ्यासपद्धती

प्रस्तुत लेखाकरीता ग्रंथालीन संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. दुय्यम साधनांच्या आधारे गुणात्मक मांडणी केली आहे.

## उद्देश

१) भारतीय संघराज्य व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२) प्रादेशिकता संकल्पना व तिचे आधार अभ्यासणे.

३) भारतीय संघराज्यात होणारी प्रादेशिक संघर्षाची मांडणी करणे.

## प्रस्तावना

भारताच्या निर्मितीपासून भारताने स्विकारलेल्या राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात ही व्यवस्था योग्य पद्धतीने वाटचाल करू शकेल का? याबाबतीत प्रश्न निर्माण केले गेले आहेत. त्यात सर्वात महत्वाची टिका भारतीय राज्यघटनेवर होते तर दुसरी भारतीय संघराज्याच्या व्यवस्थेबाबत केली गेलचे पाहावास मिळते. त्यातच भारतात केंद्र–राज्यसंबंध व राज्यांची स्वायत्तता ह्या अनुषंगाने, भारतीय संघराज्यात अस्थीरता निर्माण झालचे पहायला मिळते, ह्या अस्थिरतेच्या कारणांपैकी एक म्हणजे भारतात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली, जोपासलेली व राजकीय फायाकरीता स्विकारलेली प्रादेशिक अस्मितेची कवच कुंडले असल्याचे दिसते.

प्रस्तुत संशोधन लेखात भारतीय संघराज्य पद्धती काय आहे ती तशी असण्यामागे काय भूमिका आहे, प्रादेशिकतावाद म्हणजे काय व भारतीय संघराज्याच्या समोरील आव्हान म्हणून प्रादेशिकतावाद भारतात कशा प्रकारे कार्य करीत आहे व त्याचे परिणाम काय असू शकतात याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न सदर लेखात केला आहे. असे करत असताना संशोधकाने उपलब्ध दुय्यम साधनांच्या आधारे अभ्यासाची मांडणी केली आहे.

प्रस्तुत संशोधनाकरीता केलेली मांडणी ग्रंथालीन संशोधन पद्धतीद्वारे दुय्यममाहिती स्त्रौताच्या आधारे अभ्यासलेल्या गुणात्मक माहितीच्या विश्लेषनाच्या आधारे केलेली आहे.

स्थापन करणे, टिकवणे व वाढवणे या करीता मोठ्या प्रमाणात प्रादेशिकता या अस्त्राचा वापर झाल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये राज्यवार प्रादेशिकता ही आपल्याला तीन प्रकारामध्येबघायला मिळते.

प्रथमत: १९५० ते १९६० च्या दशकात भाषेच्या आधारावर एका जनसमुदायाचे मोठ्या प्रमाणात संघटीकरण झाल्याने त्या समुदायाकडून झालेली वेगळा राज्याची मागणी नेहरुनी देशात झालेल्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर फझल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुर्नरचना आयोगाची स्थापना करण्यात आली आणि त्याचे स्थित्यंतर नंतरच्या राज्य पुर्नरचना कायदा १९५६ ची निर्मिती झाली. हे घडण्यामागे जेष्ठ गांधीवादी पोट्टी श्रीरामलू यांची मद्रास राज्यातून वेगळे मिळून नव तेलगू भाषीक राज्याची मागणी होती हे दिसून येते. भारतातील हा स्वातंत्र्योत्तर काळातील प्रादेशिकतावादाचा पहिला टप्पा म्हणून पाहता येतो.

द्वितीय टप्पा म्हणून १९७० ते १९८० च्या दशकाचा विचार करता येतो. या दशकात भारताच्या उत्तर पुर्वोत्तर भागात वेगळ्या संस्कृतीच्या आधारावर भारतापासून स्वातंत्र्यते वेगळया राज्याची मागणी जोर धरु लागली. त्यामुळे उत्तर-पुर्वोत्तर राज्य पुर्नरचना कायदा १९७१ अस्तित्वात आला. त्या आधारावर मणिपुर, त्रिपुरा यांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा बहाल केला गेला तर मेघालय, मिझोराम', अरुणाचल प्रदेश स्वतंत्र राज्येझाली. १९८६ साली कोकणीभाषेच्या आधारावर गोवला १९८७ साली स्वतंत्र दर्जा मिळाला.

तिसरा टप्पा २००० सालानंतरचा पहाला मिळतो. ज्याद्वारे मध्यप्रदेश राज्यातून वेगळे छत्तीसगड राज्य तर बिहार मधून झारखंड व उत्तरप्रेशमधून उत्तरांचल राज्याची निर्मिती झाली. अन् अगदी अलीकडच्या काळात आंध्रप्रदेश राज्यातून नवीन तेलंगणा राज्याची निर्मिती झाली. अन् अशी मागणी उर्वरीत भारतात अनेक ठिकाणी होताना अजूनही दिसत आहे.

## प्रादेशिक अस्मितेची कारणे

**१) आर्थिक**, सामाजिक आणि राजकीय संघटन : भारतातील राज्यांना विभागण्यात आलेली जमीन आणि तिची उत्पादनक्षमता यात तफावत दिसते. तसेच स्वातंत्रेत्तर काळात झालेली भूदान, ग्रामदान चळवळ संपुर्ण देशभरात सक्रिय पद्धतीने न राबवली गेल्याने असमानता टिकूण आहे. त्याचबरोबर राज्यात असलेला मागासलेपणाचा उपोग स्थानिक राजकीय संघटनांद्वारे व्होट बँक म्हणून केला जात असल्याने परिस्थिती काय राहते व तचे स्थित्यंतर विद्वेषात होत असलचे पाहायला मिळ्ते.

**२) धिम्या** गतीने होणारी आर्थिक वाढ : स्वातंत्र्यप्राप्ती पासून ते आजतागायत भारताची अर्थव्यवस्था जोमदारपणे उभी राहिलेली दिसत नाही. त्यामुळे विकासाची ध्येय गाठण्यात भारताला अपयश येत आहे त्यात भारताची वेगाने होणारी लोकसंख्यावाढ हा प्रश्न अधिक तीव्र होण्यास कारण ठरत आहे.

**३)** मागास राज्यात असणाऱ्या मूलभूत संसाधनाची कमतरता : विकासाची प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असणारी साधणे मागास राज्यांकडे नसल्याने त्यांच्यात असंतोषाची भावना बळावत असल्याचे पाहायला मिळते.

**४)** राजकीय आणि प्रशासकीय अपशय : राज्यवार पाहणी केली असता राज्याअंतर्गत काही भागाकडे राजकीय तसेच प्रशासकीय दूर्लक्ष होत असल्याने तेथील परदेशाची नाराजी तयार होत असल्याचे बघायला मिळते.

## निष्कर्ष

१) भारतीय संघराज्य हे अर्धसंघराज्य पद्धतीचे बनलेले असून इतर संघराज्याप्रमाणे ते स्वत:चे वैशि टये निर्माण करुन बनवले असल्याचे दिसून येते. भारतीय संघराज्याच्या निर्मितीत विविधतेत एकता निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

२) प्रादेशिकता ही संकल्पना भौगोलिक आधारावर वेगळेपण सिद्ध करणारी संकल्पना असल्याचे दिसून येते. जिचे आधार भाषा, संस्कृती, राजकीय विचारधारा, आर्थिक—सामाजिक हितसंबंध असल्याचे दिसते.

३) भारताच्या संघराज्यात वेगळे स्वातंत्र्य मागणे किंवा वेगळे राज्यमागण्याचे प्रमुख आधार रोजगार, उत्पादन साधनांची वाटणी, उत्पादनाचे असंतुलन असल्याचे दिसते.

४) भारतीय संघराज्यात भाषेच्या आधारावर झालेले विभाजनाचे नव्याने परिक्षण होण्याचे गरजेचे असल्याचे दिसून येते. कारण ज्या राज्यांचे भाषेच्या आधारावर निर्माण झाले आहे आज त्याच राज्यात पुन्हा नव्या राज्यांची मागणी होत असल्याचे दिसते.

## संदर्भग्रंथ


१) भोळे भास्कर, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर.

२) जाधव तुकाराम व महेश शिरापुरकर, भारतीय राज्यघटना, युनिक पब्लिकेशन, पुणे.